Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Special Issue 20 Vol. II

on

## भारतीय समाज और विकलांग (दिव्यांग) विमर्श

## Indian Society & Ideology of Disability

October 2019

**Associate Editor**
Dr. Shivaji Wadchkar

**Guest Editor**
Principal Dr. V.D. Satpute

**Assistant Editor**
Dr. V.B. Kulkarni
Dr. A.K. Jadhav
Dr. S.A. Tengse

www.publishjournal.co.in

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue XX , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

October 2019 Special Issue- 20 Vol. II

## भारतीय समाज और विकलांग (दिव्यांग) विमर्श
## Indian Society & Ideology of Disability

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Associate Editor
Dr. S.A. Wadchkar

Guest Editor
Dr. Vasant Satpute

Assistant Editor
Dr. V.B. Kulkarni
Dr. A.K. Jadhav
Dr. S.A. Tengse

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



Special Issue XX , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

## Index


1. भारतीय समाज और विकलांग विमर्श — 10
   डॉ. ठाकूरदास.एम.वी.
2. आपका बंटी उपन्यास में बंटी की मानसिक विकलांगता — 14
   प्रा.उषमवार जी.बी.
3. विकलांगता और आत्मविश्वास — 17
   डॉ. दत्ता शिवराम साकोळे
4. भारतीय समाज में विकलांगों की समस्याएँ — 21
   डॉ. रेविता बलभीम कावळे
5. अलका सरावगी का उपन्यास 'कोई बात नहीं' में विकलांगता एवं आत्मविश्वास — 26
   डॉ.चन्नाळे विनोद प्रभाकर,
6. विकलांग व्यक्तिंचे मराठी कादंबरीतून आलेले चित्रण — 29
   प्रा. देशमुख बिभीषण
7. विकलांगो की सामाजिक स्वीकार्यता परसमाजशास्त्रीय दृष्टिकोण — 34
   धर्मेन्द्र सिंह यादव
8. विकलांग विमर्श : स्वरूप एवं अवधारणा — 39
   प्रा. डॉ. बंग नरसिंगदास ओमप्रकाश
9. अपंगाचे विश्वः वेदन आणि आत्मविश्वास — 42
   प्रा.डॉ.सा.द.सोनसळे
10. मानसिक विकलांगता : अभिशाप या समस्या — 45
    प्रा. डॉ. एकलारे चंद्रकांत नरसप्पा
11. हिन्दी चलचित्रों में दृष्टि–विकलांग विमर्श — 50
    प्रा. डॉ. विनोदकुमार विलासराव वायचळ 'वेदार्य'
12. विकलांगता, महाभारत के पात्र - विचार विमर्श — 56
    प्रा. डॉ. शोभा जगन्नाथराव यशवंते
13. कथा साहित्य में विकलांग विमर्श — 59
    प्रा.डॉ.जाधव के.के.
14. हिन्दी साहित्य में विकलांग विमर्श — 62
    डॉ. सुभाष प्रल्हादराव इंगळे
15. हिंदी कथा-साहित्य में विकलांग चरित्र — 65
    डॉ.शेखर घुंगरवार
16. श्रवण कौशल का दृष्टिबाधित बालकों के लिए महत्व : — 69
    डॉ.काळे बी.एम.
17. हिंदी साहित्य : सिनेमा और विकलांग का अंतसंबंध — 72


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX, Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
October 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

# अपंगाचे विश्वः वेदन आणि आत्मविश्वास

**प्रा.डॉ.सा.द.सोनसळे**

सहयोगी प्राध्यापक,(मराठी), कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

---

"हातों के लकीरोंको देखकर क्या नशिब अजमाते हो!!
तकदीर तो उनकेही होते हैं, जिन्हे हाथ नही होते!"

हा शेर वाचून मन हस्तरेषा पहाणाऱ्या माणसांना शोधू लागले. आणि हे हात असणारे डरपोक माणसे पाहून क्षणभर यांची दया येऊ लागली. वरील शेर खरा आहे. मी एका अपंग पित्याचा मुलगा आहे. वडिलांना आम्ही बापू म्हणत होतो. मी अनुभवले आहे. अपंग पित्याचा जीवनाशी केलेला संघर्ष आणि त्यांचा स्वाभिमान....!

अपंग व्यक्ती समाजात संख्येने कमी जरी असले तरी, त्यांचे एक विश्व आहे. अपंग माणूस कुणाच्याही दयेवर जगू इच्छित नाही. परंतु निसर्गाने त्याला विकलांग केल्याने कांही ठिकाणी त्यांना इतरांची मदत घ्यावी लागते. परंतु पूर्ण अवयवांची माणसे त्यांच्या मदतीला दुय्यम समजतात. किवंहुना अपंग माणूस इतरांना मदत करुच शकत नाही, हा कायमस्वरुपी पूर्वग्रहदुषित दृष्टीकोन तयार झालेला असतो. अपंग व्यक्ती राजकारणात, साहित्य विश्वात, चित्रपटात, संगीत कलेत, नृत्य कलेत, क्रिडा क्षेत्रात, व्यापारात, जीवणाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांचा वावर आहे. एवढेच नाही तर ज्ञान–विज्ञानाच्या क्षेत्रातही अपंगांनी मोठी कर्तबगारी बजावली आहे. समाजातील लोक अपंगाकडे अपंग म्हणून पहातात. परंतु हा दृष्टीकोन त्यांनी बदलला पाहिजे. अपंग माणसे कष्ट करुन जगतात काही अपंगाना निराधार केल्याने ते इतरांच्या दये मायेवर भीकेवर जगतात समाजाने त्यांच्यावर तशी वेळ आनलेली असते. वास्तविक पहाता जगाकडे आपण दृष्टीक्षेप टाकला तर अपंगामध्ये विशेष सामर्थ्य असलेले पहायला मिळते. कारण लुई ब्रेल, हेलन केलर, निकोलस, स्टिफन हॉकिंग या अपंग व्यक्तीनी अभूतपूर्व असे काय व कर्तृत्व करुन जगाला आपली नोंद घ्यावयास भाग पाडले आहे.

3 डिसेंबर हा 'जागतिक अपंग' दिन म्हणून साजरा केला जातो. 08 डिसेंबर 'राष्ट्रीय मतिमंद दिन' म्हणून साजरा केला जातो. तर 15 आक्टोंबर 'पांढरी काठी' दिन म्हणून साजरा केला जातो. केवळ हे दिवस प्रतिकात्मक असतात खरे तर सदैव आपण विकलांग लोकांना सन्मान दिला पाहिजे. त्यांचे रक्षण केले पाहिजे. हिच तरी खरी मानवता आणि बंधुभाव आहे. त्या मध्ये तर प्रेम आणि मैत्री आहे.

तथागत गौतम बुध्दाने जखमी हंसाला जीवदान दिले. आणि संपूर्ण प्राणीमात्रावर दया, प्रेम करण्याचा महान संदेश दिला. 1. म्हणुनच कवी आत्माराव साळवे आंधळयांची काठी होऊन चालणाऱ्या विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना म्हणतात "आंधळयांची तुच काठी, दुवळयांचा तू आधार". 2. जगदगुरु संत तुकाराम महाराजांनी म्हटले "काय करु आता धरुनिया भीड! नि:शंक हे तोंड वाजविले!! नव्हे जगी कोणी मुकियांचा जाणे! सार्थक लाजून नव्हे हित. 3. हा संदर्भ घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुक्या माणसांचा 'मूकनायक' हे पाक्षिक काढून मूक्या माणसांचा आवाज झाले. भीमक्रांतीने मुके बोलू लागले, लंगडे चालू लागले. हया केवळ कवी कल्पना नाही, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय

Special Issue XX , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

संविधानात अपंगांना समानता देण्याचे कलम टाकले आहे. के.टी.सुकासे हे लिहितात. "सामाजिक न्यायाच्या माध्यनातून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी अपंगाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करुन भारतीय घटनेतील कलम 14 मध्ये अभिप्रेत असलेली कायद्याच्या पुढे समानता साकार करण्यासाठी भारत सरकारने 1995 मध्ये कायदा करुन अपंगाच्या पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु करुन अपंगाच्या कल्याणामध्ये मैलाचा दगड रोवला". 4.समाजातील शेवटचा घटक म्हणजे अपंग होय. परंतु धडधाकट माणसांनी अपंगांना केवळ दया दाखवून चालणार नाही तर त्यांच्या कामाचा मोबदला सुद्धा देण्याचे औदार्य दाखविले पाहिजे. अपंगांना केवळ सहानुभूती न दाखविता कामात समानसंधी उपलब्ध करुन देऊन समाज प्रबोधन करणे आवश्यक आहे.

जगामध्ये अपंगाच्या बाबतीत सहानुभूतीतर आहेच पण त्यांना कमालीचे सहकार्य करतात. भारतात मात्र हिंदु, इस्लाम, धर्माने अपंगत्व हा शाप समजून अपंगांना भिकारी केले. आणि त्यांना माणूस समजण्या ऐवजी, त्यांना सहकार्य करण्याऐवजी त्यांचे शोषण केल्या गेले. धर्मग्रंथानुसार अपंगत्व हा गतजन्मीचे पाप, नशिबाचा भोग समजल्या गेले, आणि या विचारांना अपंगही बळी पडले. ते सुध्दा कांही अपवाद वगळता कुणाच्या तरी सहानुभूतीचे याचक बनले. हे मोठ्या खेदाने नमुद करावे लागते. या बाबतीत जगात काय झाले या संदर्भात नंदकुमार फुले हे वैद्यकीय क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते म्हणतात. "नंतर युनोने 1981 हे वर्ष जागतिक अपंग वर्ष म्हणून जाहीर केले. अपंगाना सर्व क्षेत्रामध्ये संपूर्ण सहभाग आणि सुदृढ व्यक्तीप्रमाणे समान संधी उपलब्ध करुन देणे हा त्या मागचा हेतू होता. नंतर 3 डिसेंबर 1982 रोजी एक ठराव पास करुन 1992 पर्यंतचे दशक विकलांग कल्याण दशक म्हणून घोषित केले". 5. जगामध्ये अशा प्रकारे अपंगाच्या संरक्षणार्थ, हिताच्या दृष्टीने प्रयत्न केलेले आपणास ज्ञात आहेत. उद्देश हाच आहे की अपंगांचे पुनर्वसनासाठी असलेल्या योजनांची माहिती अपंगांना मिळाली पाहिजे आणि नव्या योजनांची माहिती अपंगांना मिळाली पाहिजे आणि नव्या योजना आमलात आनता आल्या पाहिजेत. ही बाब आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठया गांभिर्याने घेतल्या जाते. फुले लिहितात "जिनेव्हा येथे 1 जून 1983 रोजी झालेल्या आंतरराष्ट्रीय श्रमसंमेलनाने देखील कामगार संघटनांच्या बाबत ठराव करुन अपंगांना समान वेतन व कांही व्यवसायात प्राधान्य देण्याचे मान्य केले. 1981 च्या जनगननेत भारतात 05 टक्के लोकसंख्या ही अपंग आढळली या मध्ये मतीमंदाचा समावेश नाही. 1993 हे सार्क अपंग वर्ष साजरे करण्यात आले. 03 डिसेंबर जागतिक अपंग दिन म्हणून 1995 पासून साजरा करण्या येतो". 6. अपंगत्व हे निसर्ग निर्मित असो की, मानव निर्मित असो. ते जन्मताच असो किंवा अपघातात नंतर आलेले असो. आणि ते अपंगत्व शारिरीक असो अथवा मानसिक असो. सुदृढ माणसाने आपली मानवतेची पातळी सोडता कामा नये.

'जागतीक कर्णबंधीर' दिन हा 28 डिसेंबर, म्हणून साजरा केला जातो तर सप्टेंबर महिन्याच्या शेवटचा आठवडा 'जागतिक कर्णबधीर आठवडा' म्हणून साजरा केला जातो. आपल्या देशात 1995 पासून संविधानच्या तत्वानुसार समान संधी, हक्काचे संरक्षण, संपूर्ण सहभग अधिनियम 1995 हा अपंगासाठी सर्वसमावेषक कायदा समत केला आहे. श्री. सच्चीदानंद बांगर लिहितात "अपंगांचे विशेष शिक्षण पुनर्वसन रोजगार संशोधन आणि प्रतिबंध करण्यासाठी केंद्रीय समन्वय समिती आणि राज्यस्तरीय समिती, जिल्हास्तरिय समित्यांची स्थापना करुन त्यांच्या सहाय्याने अपंगांच्या विविध प्रश्नांना हात घालून शासकीय

Special Issue XX , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Octomber 2019 | SJIF | Impact Factor : 7.139

धोरण आखून अमलबजावनी करण्याचे काम. मा. आयुक्त अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य (पुणे) यांचे कडून केले जाते". 7. अपंगासाठी शासन स्तरावर विविध कायदे, योजना आहेत. सामाजिक स्तरावर मोठ्या प्रमाणात कार्य केले जाते. पोलीओ सारखा महा भयंकर आजार भारतदेशाने अथक परिश्रम घेवून तडीपार केला आहे. सुदृढ भारत तयार करण्याच्या दुष्टीने या युगतील ही महत्वाची कामगीरी आहे. महाराष्ट्र शासनाने अपंगांच्या कल्याणार्थ व सोयीसाठी निर्गमित केलेले जी.आर.महत्वपूर्ण आहे. संगणक अर्हता परीक्षे बाबत चा निर्णय दि. 07 ऑगष्ट 2001, दि. 20 जुलै 2002, दि. 28 जुलै 2003, आणि दि. 02 सप्टेंबर 2003 चे नियम. शासन सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा वाढविण्याचा निर्णय नियम दि. 28 आक्टोबंर 1992 चा निर्णय किंवा सरळ सेवा व पदोन्नतीतधील अपंगाना आरक्षण तपासणी बाबत शासन सतत निर्णय घेत असते. शासनाने विविध सोयी सवलती दिल्या आहेत. संविधानास अनुसरुन नौकरीत 03 टक्के आरक्षण दिले आहे तर उद्योगधंदयास अनुसरुन 15 टक्के यादीत समावेश आहे. तसेच एस.टी, रेल्वे, विमान प्रवासात 1/4 सवलत दिलेली आहे. हे केवळ कर्तव्य म्हणून. संविधानाची अमलबजावणी म्हणून केले जाते.

**संदर्भः–**

1. डॉ.आंबेडकर भी.रा. – वुध्द आणि त्यांचा धम्म नागपूर दि. 30 मे 1997, पृ. 68
2. साळवे, आत्माराम – वुध्द भीमाची गीते, पृ–12
3. डॉ.पानतावने, गंगाधर – पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिजित प्रकाशन नागपूर – प्र.आ. 1987, पृ–60
4. सुकासे, के.टी. – अपंगाच्या विकासातील दूरच्यावाटा –'लक्ष्य' – संपादक राजेंद्र घोडके, प्र.आ. 2013 पृ.23
5. फुले, नंदकुमार – जागतिक अपंग दिन लक्ष्य – संपादक – राजेंद्र घोडके, प्र.आ. 2013 – पृ.15
6. कित्ता – पृ–15
7. वांगर, सचिदानंद – अपंगाकडे अपंग म्हणून न पहाता विशेष सामर्थ्य असलेला व्यक्ती म्हणून पाहणे गरजेचे. लक्ष्य – संपादक – राजेंद्र घोडके प्र–आ. 2013, पृ.19

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani